IMPACT FACTOR:4.197(IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 7 SPECIAL ISSUE 3 FEBRUARY 2021

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue on

# GENDER EQUITY IN HIGHER EDUCATION

*Chief Editor*

**Dr. R. S. Funne**
*(Principal)*

*Editors*

**Dr. J. M. Bochare**
**Dr. M.U. Khedekar**

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W).**

१५. उद्योग क्षेत्रातील यशस्वी महिला उद्योजक
**डॉ. जि.एन. सोनटक्के / डॉ. बी.एस. पवार** | ७७
१६. ग्रामीण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील लिंगभाव दृष्टिकोण ...
**डॉ. श्वेता बा. चौधारे** | ८०
१७. जागतिक स्तरावरील स्त्रीवाद : ऐतिहासिक आढावा
**डॉ व्यास सी. पी.** | ८७
१८. नोकरीच्या ठिकाणी होणारे महिलांचे लैंगिक शोषण
**डॉ.अंभुरे एस. डी.** | ९३
१९. पंचायतराज व्यवस्थेत महिला नेतृत्वाचा सहभाग
**कु. ज्योती बालासाहेब हारकाळ** | ९७
२०. ७३व्या घटनादुरुस्तीच्या परीप्रेक्षातून महिला सशक्तीकरण एक शोध
**इब्राहीम जमन तडवी** | १०२
२१. भारतामधील यशस्वी महिला उद्योजकाचे गुण व कार्य ...
**डॉ. बालासाहेब शिवाजी पवार** | १०६
२२. भारतीय राजकारण आणि महिला
**डॉ. लांडगे पी.एस.** | १११
२३. भारतीय साहित्य आणि महिला सबलीकरण
**शैला जगदंबे** | ११७
२४. महिला सक्षमीकरणाची संकल्पना : योजना व उपाय
**डॉ. बडुरे राजू सायन्ना** | १२४
२५. महिला सक्षमीकरणात कायद्याचे योगदान
**डॉ. तुकाराम रामराव फिसफिसे** | १२९
२६. महिला सक्षमीकरणात सामाजिक माध्यमांची भूमिका : एक ...
**डॉ. ज्योती पोटे** | १३३
२७. महिला सबलीकरण आणि महिला उद्योजक
**डॉ.मारोती धोडींबा कच्छवे** | १४२
२८. महिला सबलीकरण आणि ऐतिहासिक दृष्टीकोण
**जोगदंड मयुरी रमेश** | १५०

16

# ग्रामीण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील लिंगभाव दृष्टिकोण - समस्या व समाधान

डॉ. श्वेता बा. चौधारे
हिन्दी विभागाध्यक्षा,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई ता. नेवासा, अहमदनगर,

**बीज शब्द :** अधिगम पद्धती, पाठ्यपुस्तके, व्यक्ति सामाजिकरणाची प्रक्रिया, प्रतिच्छेदक

**प्रस्तावना** - कोणत्याही स्तरावरील शिक्षण पद्धतीची रचना करतानाच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याचे आश्वासन देण्यात येते. मात्र खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा अपेक्षित असा विकास घडला अथवा घडवला जातो का ? हा विषय प्रश्नांकित राहतो. लैंगिक समानता-असमानता विद्यार्थी मनावर रुजवण्याचे कामी पाठ्यपुस्तकांची भूमिका अनेक ठिकाणी महत्वपूर्ण दिसून आली आहे. बऱ्याच अंशी अभ्यासक्रमातून लिंगभावाची जडण-घडण समाजास सोयीस्कर अशीच करण्यात येते.बाल मन हे अधिक संस्कारक्षम असते. समाज आणि समजातील इतर घटकातील नाते-संबंध इ. बाबत माहिती याच काळात विद्यार्थी मनावर बिम्बवली जाते. यांत्रिकीकरण आणि आधुनिकीकरण यांची कास धरलेले शहरी भागातील लोकजीवन आणि जुन्या रीति-परंपराचा वसा टिकवून ठेवण्यासाठी झटपटणारे ग्रामीण भागातील लोकजीवन आणि या पार्श्वभूमि वर येथील विद्यार्थ्यामध्ये दिसून येणारा लिंगभाव विषयक दृष्टिकोण काही अंशी का असेना भिन्न आढळून येईल. महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेणारे विद्यार्थी बौद्धिक दृष्ट्या अधिक परिपक्व असतात, त्याच्या जिज्ञासु वृत्ति आणि आकलन क्षमतेतुन त्यांचा स्वत:चा असा दृष्टिकोण विकसित झालेला असतो, या कारणामुळे देशाचे भावी नागरिक म्हणून समाज त्याना स्थान देतो. या शोधलेखातून ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील लिंगभाव दृष्टिकोण, या दृष्टिकोण निर्मिति मागील कारणे, यातून उपन्न समस्या व समाधान शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**उद्देश -**

1. ग्रामीणमहाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील लिंगभाव दृष्टिकोनाची चिकित्सा करने.
2. विद्यार्थ्यांमधील लिंगभाव संबंधी समस्याचा अभ्यास करने.
3. विद्यार्थ्यांमधील लिंगभाव संबंधी समस्या वर उपाय सूचवने.
4. लिंगभाव दृष्टिकोनाची चिकित्सा करताना ग्रामीण स्त्री जीवनाचा अभ्यास करने.
5. ग्रामीण जातीव्यवस्थेची मीमांसा करने.
6. विद्यार्थ्यांमधील लिंगभाव समानता वृद्धिगत करण्यासाठी प्रयत्न करने.

अधिगम पद्धती मध्ये अनेकदा विषय मांडणी पासून ते विषय निवड पर्यंत लिंगभाव भेद पहावयास मिळतो. एखादी मुलगी मग ती कोणत्याही वयाची का असेना, गृहकर्तव्या मध्ये कशी दक्ष असते, याचे उदाहरण कळत-नकळत विद्यार्थी मनावर बिंबवले जाते आणि मानसिक दृष्ट्या मुली आणि मुलांच्या कामाची, काम करण्याची पद्धतीची वर्गवारी होते. शिक्षणाचा अविभाज्य घटक म्हणून त्यात समाविष्ट करण्यात येणाऱ्या शैक्षणिक सहली बद्दल चे बदलते स्वरूप पाहता यात सहभागी होण्यास मुलीच्या पालकांचा विरोध आणि प्रत्यक्षात सहभागी होणाऱ्या मुलीना दिली जाणारी वागणूक, त्यांच्या सुरक्षिततेचे प्रश्न लिंगभाव निगडितच आहे. अश्या ठिकाणी सर्वांगीण विकास या संकल्पना किती भ्रामक आहे हे सांगायला नको. मुळातच आपल्या अभ्यासक्रमाचा सार काढतांना स्त्री ही कशी कोमल, मधुर स्वभावाची, सौंदर्यातच तिचे सर्वस्व कसे सामावले आहे हे पटवण्याचा प्रयत्न केला जातो. तर पुरुष स्वभावाची चाकोरीबद्ध जडण-घडण करताना त्याचा पराक्रम, देहयष्टी या पली कडे माणूस म्हणून त्याच्या किवा तिच्या मान्यता अथवा गुणांचा विकास अपेक्षितच मानला जात नाही. भारतीय परंपरागत पितृप्रधान कौटुंबिक व्यवस्थेचा प्रभाव त्या कुटुंबा बाहेर समाजाला ही प्रभावित करतो आणि मग तो जगण्याचा नियमच बनून जातो. व्यक्ति च्या सामाजिकरणाच्या प्रक्रियेत कुटुंब, समाज, शिक्षण संस्था, राज्य, वैचारिकता महत्वपूर्ण भूमिका निभावते. यातुनच लिंगभाव आधारित अस्मितेचा जन्म होतो.

शिक्षण घेत असताना विषय निवडी पासून विशेषता : मुलीच्या बाबतीत पालकांचा कमलीचा हस्तक्षेप दिसून येतो. मुलीनी प्रत्यक्ष वर्गात किती उपस्थित रहावे, त्यांची वेशभूषा-केशभूषा, त्यांचे हसने-चालने, त्यांच्या भावना यावर पालकांचे, किंबहुना स्वता:ला पितृसत्तेचे भावी वारस म्हणून घेणाऱ्या विद्यार्थी

रूपी मुलांचे वर्चस्व अधिक दिसून येते. सामाजीकरणाच्या प्रक्रियेत निश्चित वा अनिवार्य करण्यात आलेल्या बाबीं मुली साठी'च' आवश्यक मानुन त्या प्रमाणे विध्यार्थ्यांचे आचरण दिसायला लागते. महाविद्यालयात एकमेकाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण हा 'वर्गमित्र' असा न राहता लिंग आधारित बनतो. यातून मुलीची होणारी छेड़छाड़, मुलीचे गळतीचे प्रमाण, लवकर लग्न किंवा कमी वयात विद्यार्थ्या मध्ये शारीरिक आकर्षण, यातून होणारे गुन्हे फक्त वर्तमानपत्रातील बातमी पुरते मर्यादित न राहता सामाजिक समस्या बनतात.

या पुढे ही विचार करायला लावणारा दूसरा मुद्दा जाती-धर्म आधारित लिंगभावा बरोबर जोडलेला आहे. एकाच समाजातील लिंगभाव विषमता त्या-त्या समाजातील नियमांचे रूप घेऊ लागते, पण त्या समाजाबाहेर इतर धर्म किंवा जाती साठी लिंगभाव विषमतेच्या मुळाशी असणारी दुय्यामत्वाची भावना ही मात्र विकृतीच्या रूपातच समोर येते. विशिष्ट जाती-धर्मा बाबत चा तिरस्काराचा भाव सामूहिक अपराधाला जन्माला घालतो. अश्या वेळी वर्ग, जाती, धर्म, संस्कृति च्या प्रतिच्छेदकाच्या रूपात लिंगभाव ही संकल्पना पाहिली जाते. काही विशिष्ट जाती-धर्माबाबत चा आकसपूर्ण दृष्टिकोण, त्यातही सामाजिक क्षेत्रात वरिष्ठ व कनिष्ठत्वाच्या भावनातून तयार होणारा अहंभाव, त्यातून लैंगिक तुष्टीकरणासाठी केले जाणारे नानाविध प्रयत्न यांचा महाविद्यालयीन जीवन जगताना होणारा प्रभाव यांचा अभ्यास कोठेतरी करणे आवश्यक आहे.

महाविद्यालयीन शिक्षण व्यक्तिमत्व विकासाचा महत्वाचा टप्पा आहे, ज्या काळात खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता, लिंगभाव यासारखी मुल्ये समर्थपने रुजवली जाऊ शकतात. मात्र अनेक अशा बाबी आहे ज्या मुळे या विषया बाबत चे अपूर्ण ज्ञान घेऊन विद्यार्थी बाहेर पडतो. शैक्षणीक संकुलातून बाहेर पडणारा विद्यार्थ्या शैक्षणिक गुणपत्रिकावर 'सुशिक्षित' असा शिक्का घेऊन निघतो. पण त्याचे हे शिक्षण देशाचे सुजान नागरिक म्हणून ओळख बनवण्यात अपयशी ठरते. अशात विद्यालयीन किंवा महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांना सक्तीचे लैंगिक शिक्षण दिले जावे, या शासनाने घेतलेल्या निर्णयावरुन पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्राने एके काळी केलेले रणक्रंद्रण, विरोध अजूनही स्मरणीय आहे.

मानवी मनाचा अभ्यास करणे हे मानसशास्त्राचे काम आहे. परंतु मन ही संकल्पना विशिष्ट साच्यांमध्ये बांधली जाणारी नाही. काल-स्थानपरत्वे त्यातही आजू-बाजूची परिस्थिती-परंपरा यातून मानवी मनाची जडण-घडण होत असते. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थी साधारण वय वर्षे सत्राच्या पुढील असतो.

शारीरिक दृष्ट्या परिपक्वतेचे उंबरठ्यावर तो उभा असतो. अशा स्थितीमध्ये त्यांच्या वर्तनाचा-विचारांचा अभ्यास हा शिक्षण व्यवस्था व अध्यापकासाठी महत्त्वाचा असावा. सुजाण नागरिक घडवणारा हा एक महत्वाचा टप्पा असल्यामुळे या काळात विद्यार्थ्यांच्या मनामध्ये येणारी पौंगड अवस्था ते तारुण्य अवस्थे पर्यंत चा संक्रमणाचा काळ आणि या कालातील लिंगभावा च्या संदर्भातील विचार-विकृती अभ्यासने महत्वाचे ठरेल.

महाविद्यालयीन स्तरावरील अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांवर होणारा सकारात्मक, नकारात्मक परिणाम याच बरोबरीने महाविद्यालयातील उपलब्ध समुपदेशन, विद्यार्थ्यांकडे पुरवली जाणारी वैयक्तिक लक्ष याच बरोबरीने मैदानी खेळ, ग्रंथालय व इतर सुविधांचा वापर करण्याकडे विद्यार्थ्यांचा असणारा सकारात्मक-नकारात्मक आणि तटस्थ कल, त्यातूनच परंपरा, संस्कारातून आलेल्या पूर्वगृहांचा विद्यार्थी मनावर होणारा परिणाम अभ्यासने गरजेचे ठरते. महाविद्यालयात कार्य करणाऱ्या सर्व व्यक्तिची ही जबादारी आहे की त्यांचे वक्तव्य हे लिंगनुसार पूर्वाग्रह दूषित नसावे, कामाची वर्गवारी करताना कोठेही लैंगिक दुय्यमत्व दर्शवु नये. सामाजिक संकीर्ण मान्यता, रूढ़ि-परंपरा या विषयांवर साधक चर्चा करून विद्यार्थ्यांना त्यांची मते मांडण्याची संधी द्यावी. शिक्षक म्हणून वैयक्तिक माझे मत आहे की प्रत्येक विद्यार्थ्याला सर्वप्रथम त्याचे विचार मांडण्याची संधी द्यावी आणि नंतर त्यात काही नकारात्मकता असेल तर ती दुरुस्त करण्यास त्याची शिक्षकाने मदत करावी. विचार हे लादून चालत नाही, ते पटवून द्यावे लागतात, तरच ते सहज आणि अनंत काळासाठी स्वीकारले जातात.

*जैविक दृष्ट्या स्त्री-पुरुषमध्ये भेद लिंगाच्या आधारावर केला जातो, तर लिंगभावसामाजिक स्तरावर स्त्री-पुरुषात अंतर सांगणारे वैशिष्ट्य आहे,ज्यात काळानुरूप बदल आवश्यक आहेत.*प्रत्येक समाज-संस्कृती मध्ये मुलगा-मुलगी यांच्या मूल्यमापनाच्या विशिष्ट पद्धती आहेत. त्यानुसार दोघांच्या भूमिका, त्यांचे समाज मान्य गुणदोष, त्यांच्या प्रतिसादाच्या पद्धती समाजाने ठरवून दिल्या आहेत. लिंगभाव मुला-मुलींसाठी जन्मापासूनच भिन्न सामाजिक-सांस्कृतिक कृती कार्यक्रम आखून देतो. लिंगभाव ही सांस्कृतिक बाब आहे जी स्त्री व पुरुषांची बाईपण व पुरुषपणात होणारी सामाजिक वर्गवारी सूचवते. एखादी व्यक्ती स्त्री की पुरुष हे जैविक पुराव्याने ठरते. परंतु व्यक्तीचे बाई-पुरुषपण मात्र स्थळ-काळानुरूप बदलणाऱ्या सांस्कृतिक निकषांनी ठरत असते. लिंगभाव बाबत चे पारंपारीक मानदंड बदलण्याची क्षमता खर्या अर्थाने शिक्षणात आहे. यामुळे

महाविद्यालयातील विद्यार्थी लिंगभाव बाबत किती जागृत आहे किवा लिंगभाव संबंधी कोणत्या समस्याचा सामना करत आहे, हे समजून घेणे आवश्यक ठरेल .

वर्तमान काळात चित्रपट सृष्टी मधील कथानक आणि त्याचे चित्रीकरण यामध्ये होणारे बदल समाजमनावर मोठ्या प्रमाणात प्रभाव आणि परिणाम करत आहेत. एकीकडे रूढ अर्थाने अशी मान्यता आहे की समाजाचे प्रतिबिंब चित्रपटामध्ये दिसून येते. मात्र आता याबाबत शंका आहे. या ठिकाणी चित्रपटचा मुद्दा यासाठीही महत्त्वाचा आहे की या चित्रपटांचा मोठ्या प्रमाणावर प्रेक्षकवर्ग महाविद्यालयातील विद्यार्थी वर्गातून येतो. एकेकाळी महाविद्यालयाच्या अवतीभवती फिरणारे कथानक नंतर महाविद्यालय प्रत्यक्ष घडताना पहावयास मिळू लागली. 'सैराट' हा मराठी चित्रपट प्रसिद्ध झाल्यानंतर चित्रपटातील आर्ची आणि परश्या प्रत्येक महाविद्यालयात जन्माला येऊ लागले. या घटना-संदर्भावर आक्षेप घेताना असेही सुचवले गेले की, वास्तविक जगतातील घटना चित्रपटाच्या पडद्यावर दर्शवण्यात येतात, त्यामुले चित्रपट वातावरण बिगड़वत नाही तर वास्तव समोर आणतात. या विधाना मागे हेच प्रतिपादन होत आहे कि चित्रपट ही नवनिर्मिती नसून वास्तविक जगाचे प्रतिबिंब आहे. मात्र मते काही ही असली तरी हे वास्तव आहे की महाविद्यालयीन किशोरवयीन मुलांच्या भावनांना वर्तमान चित्रपट, त्यातील गाणी किवा इतर तत्सम गोष्टी योग्य वेळेच्या आधी प्रौढता देत आहे, जे लिंगभावासाठी मात्र धोकादायक आहे. 'आइटम सॉन्ग' च्या नावाखाली स्त्री देहाचे बाजारीकरण, स्त्री कडे भोगाची वा शोभेची वस्तु म्हणून पाहण्याचा दृष्टिकोण महाविद्यालयीन जीवनात 'कट्यावरच्या चर्चेत' सहज अनुभवायला मिळतो.

ग्रामीण भागात यातील दूसरी बाजू म्हणून पालकांचा विद्यार्थाबरोबर नसलेला संवाद होय. पालकांमध्ये असलेला शिक्षणाचा अभाव, चाकोरी बद्ध जीवन, नियम आणि भाऊ-बंदकी मध्ये स्वतला गूरफटून घेणे, आर्थिक सुब्बतेचा अभाव यातुन ग्रामीण विद्यार्थी पर्यंत लिंगभाव सारखे विषय पहुचनेच अवघड झाले आहे. शहरी भागात 'समुपदेशन' चे महत्व वाढत आहे, ज्या बाबत तेथील पालक शालेय जीवनापासुन आग्रह धरताना दिसतात. मात्र ग्रामीण भागात या बाबत फारसे सकारात्मक चित्र नाही. मोठ्या प्रमाणात शेती, दुग्ध व्यवसाय आणि बाजार भावाच्या हमी ने त्रस्त ग्रामीण पालक केवल विश्वासाच्या बळावर त्याच्या पाल्यास अनेक बाबतीत मुभा देतो, मात्र वयात येणार्या मुलांबरोबर हवा तसा संवाद दिसत

नाही. अश्या वेळी महाविद्यालयांची ही जबाबदारी बनते की पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे विद्यार्थ्या बरोबर संवाद साधन्या योग्य विश्वास त्यानी कमवावा.

महाविद्यालयीन विद्यार्थी हा नजदीक च्या काळात देशाचा अधिकारप्राप्त आणि कर्तव्य या बाबतीत जागरूक नागरिक म्हणून समोर येणार आहे, त्यामुळे त्या मध्ये लिंगसंवेदनशीलता असली पाहिजे. लिंगभाव विषयक सामाजिक-मानसिक पूर्वग्रह या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येतो. यातून महाविद्यालयात एकाच वर्गात शिकणाऱ्या किंवा आपल्यापेक्षा खालच्या वर्गात शिकणाऱ्या मुलींना त्रास देणे किंवा त्रास होईल असे वर्तन करणे, प्रेम स्वीकारण्याचा अट्टहास, त्यांचा पाठलाग करणे, मोबाईल नंबर मिळवण्याची धडपड करणे, मोबाईल वरून मैत्रीचा व संवाद करण्या साठी, मैत्रीसाठी दबाव टाकण्यासाठी इतर मुलांची व मुलींची मदत घेणे, पैशाचे व बाह्य किंवा महागड्या वस्तूंच्या आकर्षण दाखवण्याचा प्रयत्न करणे, यासाठी चंगळवादाचे प्रदर्शन, इप्सित प्राप्त करण्यासाठी दलालीचा वा इतरांच्या मध्यस्थी चा स्वीकारलेला मार्ग असे प्रकार घडून येतात. यापेक्षा काही सहज दिसनरया गोष्टी जसे भिंतीवर प्रेम-संदेश लिहिणे तसेच इप्सित व्यक्तीच्या नावाने काही गोष्टी प्रचारित व प्रसारित करणे ज्यामुले त्याला किवा तिला बदनामी ल सामोरे जावे लागेल असे प्रकार महाविद्यालयीन परिसरात आढलतात. मुली साठी वेगळ्या शिक्षण संस्थाची स्थापना करने हा सद्यस्थितित उपाय नसून पळवाट ठरेल.

ग्रामीण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील लिंगभाव संबंधी समस्याचा अभ्यास करताना भूभागनिहाय अभ्यास तेथील दृष्टिकोनाची चिकित्सा करताना मदतीचा ठरू शकतो. लिंगभाव संबंधी समस्या वर चर्चा करताना ग्रामीण स्त्री जीवनाचा, तेथील परिप्रेक्षात स्त्री समस्याचा अभ्यास ही महत्वपूर्ण ठरतो. ग्रामीण जातीव्यवस्थेची मीमांसा ही अनिवार्य ठरते. या नंतर विद्यार्थ्यांमधील लिंगभाव समानता वृद्धिगत करण्यासाठी प्रयत्न खरया अर्थाने सार्थक सिद्ध होऊ शकतात. पण या साठी ही महाविद्यालयात लिंगभाव समानतेसाठी कार्यक्रमाचे आयोजन करने क्रम प्राप्त ठरेल.

**सारांश :** सदर शोध विषय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील लिंगभाव दृष्टिकोनाचा वेध घेत त्यासोबत निगडित समस्या आणि समाधानाचा अभ्यास करणारा आहे. याच बरोबरीने ज्या ग्रामीण पार्श्वभूमी वर हा शोधविषय आधारित आहे, त्यात लिंगभाव बाबत ग्रामीण भागातील पारंपारीक विचारसरणी,ग्राम्य मानसिकता,स्त्री

अभ्यास,ग्रामीण स्त्री जीवन पर्यायिने समाजशास्त्र, मानसशास्त्र या विषयाचा अभ्यास अपेक्षित आहे.

भारत सारख्या विकसनशील देशामध्ये एकूण मनुष्यबळाच्या प्रमाणापेक्षा युवकांची संख्या अधिक आहे. याच तरुण शक्तीच्या जोरावर आपण सन 2020 मध्ये जागतिक स्तरावर शक्तिशाली देश बनण्याचे स्वप्न पाहिले होते. आपले भूतपूर्व राष्ट्रपती स्वर्गीय डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे मिशन 2020 चे स्वप्न आणि वर्तमान काळामधील स्वत: ला आधुनिक म्हणवूण घेण्याचा अट्टहास करणारे भारतातील नव युवकांची मानसिकता आणि वर्तन यांचा मात्र प्रत्यक्षात ताळमेळ बसवताना अर्थशास्त्री ते मानसशास्त्र पर्यंत सर्वांचीच दमछाक होताना दिसते. एकीकडे गुणात्मक बाबींवर जोर-बैठका मारतांना दुसरीकडे विशिष्ट वर्ग, पंथ, धर्म आणि लिंग विषयक आकस मनामध्ये ठेवून ही आज स्वता: ला प्रगत म्हणून घेणारा समाज लिंगभाव निगडित अनेक नवीन प्रश्नांना सामोरा जात आहे. आधुनिकतेच्या जोरावर प्रगतीचे नव-नवीन शिखर सर करणाऱ्या भारतीय परंपरा-पूजक समाजातील 'मानवी' या संज्ञेत बसणारेकितीतरी घटक दररोज छेडछाड, छळ, पाठलाग, बलात्कारासारख्या पाशवी विकृतीनी सतावले जात आहेत. अशा घटनांनी जेथे दैनंदिन आयुष्य पछाडले आहे, तेथे या घटना मागील कारणे, त्यातून उद्भवनारी परिस्थिति, त्यांचे समाज मनावर होणारे दूरगामी परिणाम आणि उपरती म्हणून शोधले जाणारे समाधान यांचाही विचार करणे अत्यावश्यक आणि अगत्याचे ठरत आहे. या देशाचे भावितव्य म्हणून ज्या महाविद्यालयीन तरुणांकडे आपण पाहत आहोत, त्या विद्यार्थ्यांमधील लिंगभाव विषयक ज्ञान आणि दृष्टीकोण यांचा अभ्यास या सर्व परिस्थितीमध्ये महत्त्वाचा ठरतो.

**संदर्भ सूची :**


1. लिंगभाव समजून घेताना – कमला भसीन
2. महिला धोरण 2013 मसुदा – महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन
3. जेंडर, विद्यालय तथा समाज - शिक्षक शिक्षा विभाग, शिक्षाशास्त्र विद्याशाखा, उत्तराखंड मुक्त विश्वविद्यालय, हल्द्वानी
4. लिंगभाव कशासाठी – प्रीति करमरकर – 25 ऑगस्त 2019 – सकाळ आलेख
5. लिंगभाव समानता प्रस्थापित व्हावी – दिव्य मराठी आलेख


❄❄❄❄